भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/१७२**
**आरपीसीडी. को. आरआरबी. आरसीबी.बीसी. क्र.२४/०७.३८.०१/२०१२-१३ ऑगस्ट २२, २०१२**

सर्व प्रादेशिक ग्रामीण बँकांचे अध्यक्ष/सीईओ
राज्य आणि केंद्रीय सहकारी बँकां

महोदय,

**वित्तीय समावेश- बँक सेवा मिळविता येणे-**
**पायाभूत बचत बँक ठेव खाते**

कृपया, एप्रिल १७, २०१२ रोजी घोषित केलेल्या, २०१२-१३ सालासाठी असलेल्या नाणेविषयक धोरण निवेदनाच्या परिच्छेद ८८ व ८९ चा संदर्भ घ्यावा.

(२) डिसेंबर २००५ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँका व राज्य व केंद्रीय सहकारी बँकांना सांगण्यात आले होते की, त्यांनी लोकसंख्येच्या मोठ्या विभागाला, बँक सुविधा उपलब्ध होण्यासाठी, 'शून्य' किंवा अत्यल्प शिल्लक असलेले 'नो-फ्रिल्स' खाते व परवडणारे आकार असलेले खाते उपलब्ध करून द्यावे. 'नो-फ्रिल्स खाते' ह्या नावाबरोबर येणारा गैरसमज दूर करण्यासाठी, बँक प्रणालींमधील मूलभूत बँक सुविधा अधिकतर एकसमानतेने उपलब्ध व्हाव्यात ह्यासाठी, पायाभूत बँकिंग 'नो फ्रिल्स' खाती उघडण्यावरील मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार, वित्तीय समावेशावरील परिपत्रक आरपीसीडी सीओ.क्र.आरआरबी.बीसी ५८/०३.०५.३३(क)/ २००५-०६ दि. डिसेंबर २७, २००५ आणि आरपीसीडी आरएफ .बीसी ५४/०७.३८.०१/२००५-०६ दि. डिसेंबर १३, २००५ मधील सूचना मागे ठेवून /रद्द करुन, बँकांना, त्यांच्या सर्व ग्राहकांना पुढील किमान सुविधा देणारा 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट अकाउंट' देऊ करण्यास सांगण्यात आले आहे :

१. 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते', सर्वांनांच उपलब्ध असलेली नेहमीची बँक सेवा समजली जावी
२. ह्या खात्यासाठी शिल्लक रकमेची अट असणार नाही
३. ह्या खात्यात उपलब्ध असलेल्या सेवांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असेल - बँक शाखा तसेच एटीएम मधून रोकड काढणे भरणे इलेक्ट्रॉनिक प्रदान वाहिन्यांद्वारे किंवा केंद्र राज्य सरकारांच्या प्रतिनिधींनी व विभागांनी काढलेले चेक्स जमा /गोळा करणे
४. एका महिन्यात किती वेळा जमा करण्यावर मर्यादा नसली तरी, एटीएम द्वाराकेलेल्या निकासीसह, खातेदारांना महिन्यातून चार वेळाच निकासी करण्यास परवानगी असेल आणि
५. एटीएम कार्ड किंवा एटीएम कम डेबिट कार्डाची सुविधा ;

**ग्रामीण योजना आणि कर्जे विभाग, केंद्रीय कार्यालय, १०वा मजला, केंद्रीय कार्यालय ईमारत, पोस्ट बॉक्स क्र. १००१४, मुंबई-४०० ००१**
/ दुरध्वनी क्र. – ९१-२२-२२६०१०००/फॅक्स क्र.९१-२२-२२६२१०११/२२६१०९४३/२२६१०९४८ ईमेल : **cgmicrpcd@rbi.org.in**

(३) वरील सुविधा कोणत्याही, शुल्क आकाराशिवाय देण्यात येतील. ह्याशिवाय अकार्यकारी बेसिक सेव्हिंग्ज बँक डिंपॅाझिट खात्यामधील व्यवहार, मधील व्यवहार नसणे /पुनः सुरु करणे ह्या साठी ही कोणताही, आकार लावला जाणार नाही.

(४) वैधानिक पायाभूत किमान सेवांपलिकडील मूल्यवर्धित सेवा देण्यासाठी असलेली मूल्य/शुल्क रचना ह्यासह , बँका इतर आवश्यकताही, ठेवू शकतात. परंतु त्या वाजवी व पारदर्शक धर्तीवर असाव्यात व त्या भेदभाव न ठेवता लागू केल्या जाव्यात.

(५) 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खात्यांना' आरबीआयने बँक खाते उघड्ण्यासाठी वेळोवेळी, दिलेल्या,तुमचा ग्राह्क जाणा (के वाय सी) /अँटी मनी लॉन्डरिंग(एएमएल) सूचना सागु होतील. असे खाते सुलभीकृत केवायसी नॉर्म्सच्या आधारावर उघडले गेले असल्यास, ते खाते 'छोटे खाते' म्हणून समजले जाईल. आणि केवायसी नॉर्म्स / एएमएल मानके /वित्तीय दहशतवादाचा सामना (सीएफटी) / पीएमएलए खाली बँकांची दायित्वे ह्या वरील महापरिपत्रक आरपीसीडी.सीओ.आरआरबी.एएमएल.बीसी. क्र.१५/०३.०५.३३(इ)/ २०११-१२ दि. ऑगस्ट ८, २०११, आरपीसीडी.सीओ.आरआरबी.एएमएल.बीसी. क्र.६३/०७.४०.००/२०१०-११ दि. एप्रिल २६, २०११, 'छोटे खाते' उघडल्यावर आणि आरपीसीडी.सीओ.आरआरबी.एएमएल.बीसी. क्र.२१/ ०३.०५.३३(इ)/२०११-१२ दि. ऑक्टोबर १३, २०११, आरपीसीडी.सीओ.आरआरबी.एएमएल.बीसी. क्र.२३/०७.४०.००/२०११-१२ दि. ऑक्टोबर १७, २०११ केवायसी नॉर्म्सवरील नाव, पत्ता व आधार क्रमांकाची माहिती असलेल्या युआयडीएआयने दिलेले पत्र, मधील अटी त्याला लागु होतील

(६) 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते ' उघडले असलेले ग्राहक, त्या बँकेत अन्य कोणतेही बचत खाते उघडण्यास पात्र असणार नाहीत. त्या बँकेत अन्य सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते असलेल्या ग्राहकांना ते खाते त्यांनी 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते ' उघडल्यापासून ३० दिवसांच्या आत बंद करावे लागेल.

(७) वरील परिच्छेद(२) अनुसार, विद्यमान "नो फ्रिल्स" खाती, 'बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट खाते' बँक खात्यामध्ये परिवर्तित केली जावीत.

आपला विश्वासु

(सी.डी श्रीनिवासन्)
मुख्य महाव्यवस्थापक